Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

January-2023

(CCCLXXXVI) 386(C)

**NATIONAL EDUCATION POLICY 2020**

**QUALITY ENHANCEMENT IN HIGHER EDUCATION**



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Vilas Aghav
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Dist. Hingoli (MS)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 23 | नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षणातील बदल<br>प्रा. डॉ. रामदास धो. मुकटे | 85 |
| 24 | नवे शैक्षणिक धोरण - आव्हान आणि संधी विशाल डोळे | 89 |
| 25 | नवीन शैक्षणिक धोरण आणि सर्जनशीलता डॉ. महेश्वर मंगनाळे | 95 |
| 26 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महाविद्यालयाचे क्लस्टरींग आणि स्वायत्तता<br>डॉ. घन आनंद लक्ष्मीकांत | 98 |
| 27 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 व 2020 च्या उद्दिष्टांच्या तौलनिक अभ्यासात मराठी भाषेचा वाढता प्रभाव व अध्यायनातील सकारात्मकता प्रा. अरुण कुमार पाम्पटवार | 104 |
| 28 | NEP 2020: बहुविद्याशाखीय उच्च शिक्षणाच्या दिशेने बालाजी कोटकर | 107 |
| 29 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020: उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढ; चारवर्षाच्या पदवी अभ्यासक्रमा व दर्जेदार शैक्षणिक संशोधन<br>पवन उत्तम पडघान, डॉ. प्रशांतकुमार जोशी | 109 |
| 30 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020: समस्या आणि आव्हाने<br>मनिषा संतोषराव बोरकर, किरण हनुमंतराव सूर्यवंशी | 116 |
| 31 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 भारतीय भाषा कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन<br>कीर्ती नारायणराव पंडित | 120 |
| 32 | नई शिक्षा निती 2020 प्रा.डॉ. सोळंके नवीन केशवराव | 125 |
| 33 | राष्ट्रीय शिक्षा नीती में शिक्षकों की भूमिका डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र | 128 |
| 34 | राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० : बहुभाषिकतावाद और भाषा की शक्ति--एक अनुशीलन डॉ. संजीवकुमार नरवाडे | 131 |
| 35 | नई शिक्षा नीति में हिंदी भाषा की उपयोगिता प्रा. तुकाराम वसराम आडे | 136 |



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- C
ISSN : 2278-9308
January, 2023

# नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षणातील बदल

प्रा. डॉ. रामदास धो. मुकटे
शिवाजी महाविद्यालय हिंगोली.

**सारांश**

भारतातील नवीन शैक्षणिक धोरणामुळे एकूणच शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल होत असल्याचे दिसून येत आहेत. विशेषतः उच्च शिक्षणामध्ये बदलत्या धोरणाचा प्रभाव मोठा आहे. यामध्ये कौशल्यपूर्ण शिक्षणावर भर दिला जात आहे. पदवी अभ्यासक्रमाचा कालावधीमध्ये बदल करून पदवी अभ्यासक्रमाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार विद्यार्थी तीन व चार वर्षाची पदवी घेऊ शकतात. चार वर्षाची पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनासह पदवी प्राप्त होईल आणि असे विद्यार्थी पीएच.डी.साठी प्राप्त होतील. संशोधनावर भर देऊन उच्च शिक्षण जागतिक दर्जाचे कसे होईल आणि विदेशी विद्यापीठासी समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य मोठ्या प्रमाणात प्राप्त झाले आहे. अशा या प्रमुख बदलाबरोबरच इतरही बदल उच्च शिक्षणामध्ये होणार आहे हे या लघु संशोधन नाच्या माध्यमातून सांगता येते.

**प्रस्तावना**

शिक्षण हे सामाजिक व आर्थिक विकासाचा महत्वपूर्ण घटक आहे. स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल करून शिक्षणाचा दर्जा आणि व्याप्ती वाढवण्याचा वेळोवेळी प्रयत्न करण्यात आला आहे. त्यापैकीच एक प्रयत्न म्हणजे नवीन शैक्षणिक धोरण 2020 होय. भारतात 34 वर्षानंतर म्हणजेच 1986 च्या शैक्षणिक धोरणानंतर 2020 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 29 जुलै 2020 रोजी केंद्र सरकारच्या केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय यांच्याकडून जाहीर करण्यात आले आहे. पूर्वीच्या शैक्षणिक धोरणामध्ये आणि सध्याच्या शैक्षणिक धोरणात मोठ्या प्रमाणात बदल असल्याचे दिसून येतात. नवीन शैक्षणिक धोरणाची आखणी खऱ्या अर्थाने 2015 पासून चालू होती. भारत सरकारने 2015 मध्ये सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आणि त्यांचा अहवाल 11 जून 2017 मध्ये प्राप्त झाला. त्यानंतर कस्तुरी रंग यांच्या अध्यक्षतेखाली नवीन समिती स्थापन केली आणि यांच्या समितीच्या धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आणि हा मसुदा विद्यार्थी,पालक,शिक्षक याप्रमाणे सार्वजनिक चर्चेसाठी तो ठेवण्यात आला. त्यानुसार अनेक तज्ञांनी यामध्ये सुधारणा सुचवल्या त्यानुसार आणि पूर्वीचा मसुदा या आधारावर नवीन शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आली. या शैक्षणिक धोरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात बदल होतील हे अपेक्षित आहे. धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष 2022-23 पासून केली जाईल असे केंद्र व राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आले आहे.

**संशोधनाची आवश्यकता**

पूर्वीचे शैक्षणिक धोरण आणि नवीन शैक्षणिक धोरण 2020 या दोन्ही शैक्षणिक धोरणांची रचना वेगवेगळया प्रकारची असून नवीन शैक्षणिक धोरणाची व्याप्ती पूर्वीच्या शैक्षणिक धोरणापेक्षा विस्तारित आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे एकूण शैक्षणिक क्षेत्रात कोणते बदल होत आहेत. केंद्र व राज्य सरकारचे शैक्षणिक क्षेत्रातील बदला विषयी काय? धोरण आहे. शिक्षणाची रचना यामध्ये काय? बदल होत आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध टप्पे यामधील होणारा बदल, विशेषत: उच्च शिक्षणामध्ये काय बदल होऊ घातले आहेत हे माहिती होण्यास ची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुत लघु संशोधन करण्यात आले आहे.

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Dist. Hingoli (M.S.)



212

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- C
ISSN : 2278-9308
January, 2023

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. नवीन शैक्षणिक धोरणाचा आढावा घेणे.
2. नवीन शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षणातील होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.
3. नवीन शैक्षणिक धोरणा नुसार उच्च शिक्षणाची रचना कशी असेल याचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत लघु संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या द्वितीय पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीय संशोधन पद्धतीची साधने की,ज्यामध्ये संशोधन कार्य संदर्भातील संदर्भ ग्रंथ,क्रमिक पुस्तके,संशोधन लेख,वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया यांच्या साह्याने आवश्यक ती माहिती उपलब्ध करण्यात आली आहे.

**विषय विवेचन**

केंद्र सरकारने स्वातंत्र्यानंतर देशाच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात बदल घडवून विकासाचेउदीष्ट्ये साध्य करण्याचे उद्देशाने देशाच्या अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रात वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेऊन बदल करण्यात आलेले आहेत. याप्रमाणेच देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात अपेक्षित बदल घडून आणण्यासाठी 34 वर्षानंतर नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती करण्यात आली आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री यांच्याकडून हे धोरण जाहीर करण्यात आले व त्याची अंमलबजावणी येत्या वर्षापासून होणार आहे. यामध्ये मंत्रालयापासून ते विद्यार्थ्यापर्यंत अनेक बदल होऊ घातलेले आहेत. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नामकरण करून शिक्षण मंत्रालय असे होणार आहे. तर केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री या ऐवजी केंद्रीय शिक्षण मंत्री असा उल्लेख भविष्यात केल्या जाणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणात पूर्व प्राथमिक,प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण या शिक्षणाच्या सर्वच टप्प्यांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आणण्यात आले आहेत. 'पूर्वीच्या 10+2+3 या आकृतीबंधा ऐवजी 5+3+3+4 अशा प्रकारचा शैक्षणिक आकृतीबंध असेल. हा आकृतीबंध अनुक्रमे 3 ते 8, 5 ते 11, 11ते 14 आणि 14 ते 18 या वयोगटासाठी असेल.'[1] विद्यार्थ्यांच्या संकल्पना सविस्तरपणे परिपूर्ण होतील ही अपेक्षा लक्षात घेऊन प्राथमिक शिक्षण म्हणजे 5 व्या वर्गापर्यंत मातृभाषेतून देण्यात येणार आहे. तर त्यानंतर शिक्षण हे बहुभाषिक पद्धतीने उपलब्ध असेल. यामुळे विद्यार्थ्यांचा पाया मजबूत होईल आणि माध्यमिक शाळांत परीक्षेच्या शेवटी विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन तयार होतील अशी अपेक्षा आहे. यामध्ये उल्लेखनीय बाब अशी आहे की, 'प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच द्यावे अशा प्रकारची सक्ती या ठिकाणी नाही. कारण ही बाब अनिवार्य केली तर शिक्षणातील स्वातंत्र्याला बाधा येईल ते घटनाबाह्य असेल आणि त्यामुळे जिथे शक्य असेल तिथेच मातृभाषेतून शिक्षण असा उल्लेख करण्यात आला आहे.'[2] शिक्षण कोणत्या भाषेतून घ्यायचे हे पालक व विद्यार्थी यांच्या इच्छेनुसार असेल.

नवीन शैक्षणिक धोरणा नुसार सर्व स्तरावरील विद्यार्थी सहजरीत्या आणि सोप्या पद्धतीने शिक्षण घेऊ शकतील हा विचार समोर ठेवून विद्यार्थी केंद्रबिंदू माणून धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारून शिक्षणाला पूर्णत्वाने अखंडत्व देण्याचे प्रयत्न यामध्ये करण्यात येणार आहेत. व्यावसायिक शिक्षणावर आणि रोजगार भिमुख शिक्षण कौशल्य विकसित करण्यावर अधिक भर देण्यात येणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणाच्या बाबतीत व्यावसायिक शिक्षणाचा उच्च शिक्षणाबरोबर समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आणि बहु विषय निवड व शाखा निवड याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात आलेले आहे. म्हणजेच सध्याच्या बहुशाखिय शिक्षणाचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये शाखांचे एकत्रीकरण करून महाविद्यालय आणि प्राध्यापक वर्ग यांचेही एकत्रीकरण करून बहुशाखीय शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. म्हणून असे म्हटले जाते की, "उच्च शिक्षण आता झाले आंतरशाखीय शिक्षण" यामुळे विज्ञान, कला व वाणिज्य अभियांत्रिकी या विषयावर विभागातील मर्यादा संपुष्टात येऊन

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (M.S.)

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- C
ISSN : 2278-9308
January, 2023

विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विषय निवड व विषय ज्ञान प्राप्त करून घेण्याची संधी प्राप्त झाली आहे. उदा. कला शाखेचा विद्यार्थी अभियांत्रिकी विषयातील कम्प्युटर इन्स्ट्रुमेंट हा विषय अभ्यासू शकतो.

पदवी अभ्यासक्रम हा तीन ते चार वर्षाचा असेल त्यामध्ये तीन टप्पे करण्यात आलेले आहे. पहिला टप्पा- पहिल्या वर्षात प्रवेश घेतला परीक्षा दिली आणि विद्यार्थी पास झाला व शिक्षण बंद केले तर त्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र मिळेल व त्या आधारे ते विद्यार्थी नोकरी करू शकतील. दुसरा टप्पा-जे विद्यार्थी दुसऱ्या वर्षाचे शिक्षण पूर्ण केलेले आहेत त्यांना डिप्लोमा पदवी मिळेल. तिसरा टप्पा- जे विद्यार्थी तीन वर्षाचे पदवी शिक्षण पूर्ण करतील त्या विद्यार्थ्यांना पदवी मिळेल. अशा प्रकारचे तीन टप्पे असतील.

जे विद्यार्थी चार वर्षाची पदवी अभ्यासक्रम घेऊ इच्छित असतील असे विद्यार्थी त्यामध्ये पदवी सह एक वर्ष संशोधन करतील अशा विद्यार्थ्यांना संशोधन सह पदवी मिळेल. चार वर्षाची पदवी घेणारे विद्यार्थी सरळ पीएच.डी. संशोधनासाठी ते पात्र असतील सरल ते पीएच.डी.ला प्रवेश घेऊ शकतील.

पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात सितिलता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तो म्हणजे चार वर्षाची पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला फक्त एका वर्षात पदवित्तर अभ्यासक्रम पूर्ण करु शेकेल. आणि तीन वर्षाची पदवी प्राप्त करणाऱ्या अभ्यासाला विद्यार्थ्याला दोन वर्षाचा पदवीत्तर अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. अशाप्रकारे पदव्युत्तर अभ्यासक्रमाची संधी विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. सामायिक अभ्यासक्रम(Integrated) आणि तो आहे पाच वर्षाचा विद्यार्थ्याला सुरुवातीलाच एकूण पदवी आणि पदवीत्तर अशी निवड करावी लागेल.

या शैक्षणिक बदलाबरोबरच अकॅडमी बँक ऑफ क्रेडिट ही एक नवीन संकल्पना उदयास आली आहे. याद्वारे उच्च शिक्षणात उच्च शिक्षण श्रेयांक पद्धतीवर भर देण्यात आला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणामध्ये विविध ठिकाणी आपल्या आवडीनुसार शिक्षण घेतले आहे.याचे क्रेडिट या बँक मध्ये जमा होतील व या श्रेयांकाच्या आधारावर त्या विद्यार्थ्याला पदवी दिली जाईल.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ शिक्षकाद्वारे न करता स्वतः विद्यार्थी,सह विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून केले जाईल. याचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्य विकसित व्हावा हा आहे. उच्च शिक्षणामध्ये विधी व वैद्यकीय शाखा वगळता एकच नियामक मंडळ एकच असेल.

संशोधनावर भर देऊन विज्ञान शाखेप्रमाणेच कला व वाणिज्य शाखेलाही संशोधनासाठी विशेष प्राधान्य दिले जाईल आर्थिक मदत केली जाईल आणि संशोधनाच्या मदतीने शिक्षणाचा दर्जा उंचावून शिक्षण जागतिक दर्जाचे कशा पद्धतीने करता येईल यावर भर दिला जाणार आहे. महाविद्यालयाचे काही गट तयार केले जाणार आहेत आणि त्यामधून शिक्षणाचे एकत्रीकरण बहुशाखियय महाविद्यालय निर्माण केले जातील.

आशाप्रकारे उच्च शिक्षणातील बदल नवीन शैक्षणिक धोरणानुसार होणार असल्याचे दिसून येतात.

**संशोधनाचे निष्कर्ष**

1. पदवी व पदव्युत्तर शिक्षणाचा कालावधी यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या इच्छेनुसार कालावधी बदलता येतो.
2. बहुशाखिय शिक्षण पद्धतीचे एकत्रीकरण करून अनेक विषय शिकण्याचे संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे.
3. व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमावर भर दिला जाणार आहे.
4. महाविद्यालयाचे एकत्र गट तयार करून भविष्यात शिक्षण देण्याची रचना तयार करण्यात आली आहे.
5. विज्ञान शाखेप्रमाणेच कला व वाणिज्य यासारख्या शाखांच्या संशोधनावर भर देऊन आर्थिक साह्य करण्यात येणार आहे.

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



214

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- C
ISSN : 2278-9308
January, 2023

6. उच्च शिक्षण जागतिक दर्जाचे होऊन भारतीय विद्यापीठ आंतरराष्ट्रीय विद्यापीठाशी समन्वय निर्माण करतील असे अपेक्षा या ठिकाणी आहे.

अशा प्रकारची प्रमुख निष्कर्ष प्रस्तुत लघु संशोधनाचे सांगता येतात.

संदर्भसूची

1.'राष्ट्रीय शिक्षा नीती 2020' मनुष्यबळ विकास मंत्रालय अहवाल.
2.https://www.weeklyssdhana.in
*डॉक्टर कोठारी आयोग राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 आणि 1986
*विकिपीडिया
*युट्युब
*दैनिक सकाळ वृत्तपत्र 9 ऑगस्ट 2020
*https://www.education,gov.in

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)